जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 NOV 2025
तरुण भारत

# 'संविधान जागर'अंतर्गत विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानातील विशेष तरतुदी : संविधान जागर ही वार्षिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत आहे. याअंतर्गत बुधवार दि. २६ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक, ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांचे व्याख्यान होणार आहे. गेल्या चार महिन्यांपासून ही व्याख्यानमाला सुरू आहे. यामध्ये तज्ज्ञ, अभ्यासक, विचारवंत यांचे व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव–वार्ता' या युट्यूब वाहिनीद्वारे ऑनलाईन स्वरुपात प्रसारित करण्यात येते. व्याख्यानाचे हे चौथे पुष्प आहे. भारतीय संविधानातील विशेष तरतुदी या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 NOV 2025
पुढारी

# विद्यापीठात 'संविधान जागर' अंतर्गत उद्या विशेष व्याख्यानाचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'संविधान जागर' व्याख्यानमालेअंतर्गत २६ नोव्हेंबर रोजी राज्यशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक तथा ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. प्रकाश पवार यांचे 'भारतीय संविधानातील विशेष तरतुदी' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान जागर' ही वार्षिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत आहे. २६ ऑगस्टपासून दर महिन्याच्या २६ तारखेला सकाळी ११ वाजता व्याख्यानमालेअंतर्गत तज्ज्ञ अभ्यासक, विचारवंत यांचे व्याख्यान 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीद्वारे ऑनलाईन स्वरूपात प्रसारित करण्यात येत आहे. बुधवारी (दि. २६) संविधान दिनी व्याख्यान यूट्यूब लिंकवर उपलब्ध असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 NOV 2025
पुढारी

# विद्यापीठात आज ज्येष्ठ संशोधक काशीनाथ देवधर यांचे विशेष व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी व स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २५) दुपारी दोन वाजता 'मिट द सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत भारत सरकारच्या पुणे येथील संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) ज्येष्ठ संशोधक तथा निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. 'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ते व्याख्यान देणार आहेत. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. पी. जे. पाटील, प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 NOV 2025
पुढारी

# हिवाळी सत्र परीक्षेला २८ हजारांवर विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला २८ हजार २६९ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीए., बी.कॉम., बीसीए., एमसीए, एमए बॅचलर ऑफ लॉज, बॅचलर ऑफ डिझाईन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बीआयडी आदी ५२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७४ केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. भरारी पथकाकडून कोल्हापूर (१९), सांगली (०३) अशा एकूण २२ प्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 NOV 2025
पुढारी

# राष्ट्रीय बुद्धिबळ पंच परीक्षेत सावळकर उत्तीर्ण

**कोल्हापूर :** अखिल भारतीय बुद्धिबळ, महाराष्ट्र बुद्धिबळ व मुंबई सबर्बन संघटना आयोजित वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच परीक्षेत कोल्हापूरचा आदित्य सावळकर उत्तीर्ण झाला. दोन दिवस चर्चासत्र व परीक्षा झाली. ५६ बुद्धिबळ खेळाडू यामध्ये सहभागी झाले होते. सावळकर हा शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. स्पोर्टस्च्या तिसऱ्या वर्षात शिकत आहे. त्याला विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, चेस असोसिएशनचे अध्यक्ष भरत चौगुले, मनीष मारूलकर, अंजली सावळकर, मुकुंद सावळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2025
पुढारी

# आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी हर्षवर्धन पाटील, सौरभ वालीची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय ज्युदो स्पर्धेत न्यू ज्युदो प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी दोन सुवर्ण, कांस्य व एक रौप्य अशा एकूण पाच पदकांची निवड केली. यात हर्षवर्धन पाटील याने ८१ किलो गटात, तर सौरभ वाली याने १०० किलो गटात सुवर्णपदकांची कमाई केली. दोघांची निवड भोपाळ येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठीच्या शिवाजी विद्यापीठ संघात झाली आहे. स्पर्धेत दिपशिका कुलकर्णी (रौप्य), प्रणिता भोसले व गौरांग पाडळकर (कांस्य) पदके पटकाविली. सर्वांना प्रशिक्षक शरद पोवार, अध्यक्ष लालासो गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.